# ॥ चैतन्य लहरी ॥



सन १९९४-९५ सप्टेंबर, अंक क्र.२

# शिवरात्री पूजा दिल्ली दि. १४ मार्च १९९४

(प. पू. माताजींनी केलेला उपदेश)

(परम पूज्य श्री माताजीनी केलेला उपदेश) आज तुम्ही श्री सदाशिवांची पूजा करणार आहात. श्री सदाशिव आणि श्री शिव यांच्यातील फरक हा आहे की श्री सदाशिव सर्व शक्तिमान परमेश्वर असून आदि मातेच्या लीला नाट्याचे लेखक आहेत. श्री सदाशिव आणि आदिमाता आदिशक्ति यांची एकात्मता चंद्र आणि त्याचा प्रकाश किंवा सूर्य आणि सुर्यप्रकाश यांच्या प्रमाणे आहे. मानवी विवाहांच्यात अथवा मानवी नात्यांच्यामधे अशा प्रकारचे संबंध आपण समजू शकत नाही. आदिशक्ति जे काही निर्माण करीत आहेत ते श्री सदाशिवांची इच्छा आहे. श्री सदाशिव त्याला साक्षी आहेत. आणि ते पहात असतात त्यावेळी ते त्याला साक्षी असतात. ते सर्व विश्वाचे साक्षी असून ते या पृथ्वीमातेचेही साक्षी आहेत. सर्व सृष्टींची निर्मिती आदिशक्ती करीत असते. त्यांची शक्ति साक्षीस्वरूपत्वाची आहे. अशी आदिशक्तीची शक्ति सर्वव्यापि आहे.

सर्व शक्तिमान परमेश्वर, आदिपिता आपली इच्छाशक्तीमध्ये आदिमाता म्हणून व्यक्त करतात आणि आदिमाता त्यांची शक्ति प्रेमातून व्यक्त करतात. त्यांचे नाते अतिशय समजुतीचे आणि गहन आहे. त्यांच्या निर्मितीमधे जर काही अडचण आहे अथवा त्यांच्या कार्यात अडथळे आणणारे लोक असतील तर ते त्यांचा (परमपिता) विनाश घडवून आणतात.

विनाशकारी शक्ति ते सांभाळतात. मानवाच्या ह्रदयात ते प्रतिबिंबीत होतात. ते सर्व सृष्टितस्पंदित होतात पण ते स्पंदन आदिमातेची शक्ति असते. आणि आदिमातेच्या योजनेच्या विरोधात काहीही असले तरी त्याचा ते नाश करु शकतात. आदिशक्ती प्रेम आहेत. त्या क्षमा करतात. त्या ज्याची निर्मिती करतात. त्याच्यावर त्यांचे प्रेम असते. त्यांची इच्छा असते की त्यांच्या निर्मितीची उन्नति व्हावी व ज्याच्या साठी त्यांना निर्माण केले आहे त्या पातळीपर्यंत त्यांनी उत्क्रांत व्हावे. त्यांची इच्छा असते की ज्या पातळीवर श्री सदाशिवांच्या म्हणजे परमेश्वरी राज्यात प्रवेश करता येईल

जेथे ईश्वरी आनंद, क्षमाशीलता, आनंद आहेत त्या पातळीपर्यंत मानवाने जावे. तुमच्यामधे मुमूक्षत्व असेल, त्या पातळीवर जाण्याची अंगभुत इच्छा असेल तरच ते सर्व शक्य होईल.आपल्यातील ही इच्छा आदिमातेचे प्रतिबिंब आहे.आता ही इच्छा आहे आणि आपल्या प्रगतिच्या आड येणाऱ्या भौतिक स्वरुपाच्या इच्छा पण आहेत. सहजयोगात, संन्यास घेऊन अथवा घर सोडून जाऊन या इच्छेवर मात करण्याचा प्रयत्न आपण कधी केला नाही.

प्रथम तुमच्या आत्म्याचा प्रकाश तुम्ही मिळविता आत्मा श्री सदाशिवांचे प्रतिबिंब आहे. आत्मा, सदैव जळत राहून मार्गदर्शन करणाऱ्या प्रकाशा प्रमाणे आहे. त्या मार्गावर स्वतः तुम्हीच इतके सूज्ञ होता की त्या सूज्ञतेच्या प्रकाशात तुम्ही मार्गक्रमण करता. तुम्ही धर्माच्या प्रकाशात चालता, कारण तुमच्या आत्म्याच्या प्रकाशात विनाशकारी गोष्टी दिसून येतात. सर्व विनाशकारी जे काही आहे त्याचा त्याग करु लागला, हे सोडा, ते सोडा असे कोणी सांगावे लागत नाही. तुमच्या स्वतःच्या लक्षात येते की हे चुकीचे आहे आपण करु नये. माणसांच्या या बद्दल माझी ही समजूत होती. कारण सध्याच्या दिवसात लोक पूर्ण पणे भ्रांतिमधे आहेत. कायम ते संघर्षात असतात. त्यांना जगण्यासाठी झगडावे लागते. अशा परिस्थितीत तुम्ही संन्यास घेऊन हिमालयात गेला असता तर सगळेच बिघडले असते. असंख्यांच्यासाठी जर तुम्हाला करायचे असेल तर काहीतरी मुळातूनच करायला हवे होते आणि सदैवाने, तुम्हाला अंकुरित होऊन साक्षातकारी होता येईल असा मार्ग शाधून काढणे मला शक्य झाले. आत्मसाक्षातकारी लोकांनी काही गोष्टी समजून घ्यायला हव्यात. कारण साक्षातकार मिळालेले अनेक लोक आहेत. त्यांच्यात काय कमी असेल तर शरणागति. आधुनिक सहज योगाची ही एकच अट आहे की तुम्हाला खरोखर शरणागत व्हायला हवे. तुम्ही तुमच्या बुध्दीचा व इतर पध्दतिंचा सहज योग समजण्यास उपयोग करु लागाल तर ते जमणार नाही. तुम्ही शरणागत व्हायलाच हवे. इस्लाम याचा अर्थ शरण जाणे. शरणागति नसल्यास परमेश्वरी राज्यात प्रस्थापित होणे अशक्य आहे. शरणागति याचा अर्थ तुम्ही प्रपंच, कुटुंब, घर वगैरे सोडावे हा नाही तर शरणागति म्हणजे तुमच्या अहंकाराचा व संस्कारांचा त्याग करणे. उदा.मला एक गृहस्थ भेटले त्यांना फारच त्रास होता. मी "तुमचे गुरू कोण असे विचारल्यावर त्यांनी एका गुरूचे नांव सांगीतले. मी म्हणाले त्याने तुमचे काही भले नाही तेव्हा तुम्ही त्याला सोडणार का?" ते म्हणाले "उद्या" मी म्हणाले " आज का नाही". त्यांनी सागीतले "मला त्यांचे फोटो वगैरे फेकून द्यायचे आहेत.तेव्हा मी उद्या करीन".त्यांनी विचारले की काय काय टाकून द्यायचे त्यावर मी सांगीतले की ज्याचा उपयोग त्यांची पुजा करण्यास तुम्ही करीत होता ते सर्व टाकुन द्या. मग त्यांनी सर्व समुद्रात टाकून दिले व त्यास सांगीतले" क्षमा करा, या माणसामुळे मी इतका त्रास काढला पण तुम्ही नका सहन करू अशी त्यांची कुशाग्र बुध्दी होती.सगळ्यांना सोडणे जमत नाही.लोक धरून बसतात ज्यांना आपले संस्कार सोडता येत नाहीत असे अनेक लोक मला माहित आहेत. अहंकार सोडण्यापेक्षा ते अधीक कठीण आहे. अनेक प्रकारचे संस्कार आसतात.आपला पहिला संस्कार असतो की आपला भारतात जन्म झाला आहे.सहज योगात आल्यावर लोकांच्या एकदम समजते की त्यांच्या देशात, धर्मात काय चुकते.लगेच त्यांना स्पष्ट दिसून येते की, "हे चुकले." असे कोणी म्हणत नाही की आम्ही भारतीय आहेत, इंग्रज आहोत, म्हणून आम्ही सर्वात चांगले आहोत. उलट इतक्या लोकांना अद्याप आत्मसाक्षातकार मिळला नाही याची त्यांना करूणा वाटते. आणि "आपण त्यांना आत्मसाक्षात्कार का देऊ नये," असे

वाटते हे प्रकाशाचे दुहेरी कार्य होय

प्रथम तुम्हाला समजते की प्रकाश आहे आणि तुम्ही प्रकाश झाले आहात. तेव्हा तुमचे चित्त जाईल तेथे तुम्हाला सत्य दिसू लागते आणि तुम्हाला कळते की आपल्या देशाचे, आपल्या समाजाचे हे संस्कार होते. मग जे चुकीचे आहे ते त्यांना नकोसे वाटते. ते त्याच्याशी ते समचित्र होत नाहीत तर प्रथम शरणागति होते.

शरणागतिमधे तुम्ही अशी स्थिती विकसित करता की त्यात तुम्ही आंतरयामी संन्यासी होता. याचा अर्थ तुमच्यावर कोणीच प्रभुत्व चालवू शकत नाही. संन्यासी व्यक्ति इतर प्रत्येक गोष्टीच्या वर असते त्याला काहीच चिकटू शकत नाही. केवळ पाहूनच त्याला काय आहे ते समजते तो चुकीचे काहीच करीत नाही बोलून दार्खवित नसला तरी त्याला प्रत्येक गोष्ट समजते तो इतका अनासक्त असतो की अनासक्तीमधेच त्याला चुकीचे काय आहे ते दिसू लागते. तो स्वतःच्या कुटुंबाला पाहु लागताच, दुसऱ्यांना पाहू लागताच त्याला चुकीचे काय आहे ते समजते तो कशाशीच समचित्त होऊन रहात नाही. मी तुर्कस्तानला गेले होते त्यावेळी एका स्विस गृहस्थाला भेटले. त्याने माझ्याकडे आत्मसाक्षात्कार मागीतला. स्वित्झर्लंडमधे हे मी पाहिले नसल्याने मला आश्चर्य वाटले. आत्मसाक्षात्कारानंतर लगेच तो गृहस्थ म्हणाला "मी परत जाणार नाही". हे स्पष्ट आहे की हा प्रकाश तुम्हाला निश्चितच प्रचंड सूज्ञता आणि संतुलन देतो. समजा, तुम्ही चालत आहात आणि तुम्हाला रस्ता दिसत नाही तर तुम्ही पडाल सुध्दा. पण थोडासा जरी प्रकाश असेल तरी तुम्हाला दिसू लागेल. सहज योगाने हेच केले आहे. त्याने तुम्हाला थोडा प्रकाश दिला आहे तो थोडा प्रकाशच तुम्हाला अनेक गोष्टींचा त्याग करण्यास पुरेसा आहे.

दुसऱ्या बाजूस अहंकार असतो. मणसाच्या कडे अहंकार ही फार सूक्ष्म गोष्ट असते. काहींच्या जवळ इतका अस्थिर अहंकार असतो की थोड्याश्या गोष्टीमुळे तो उफाळून वर येतो, आणि थोड्याश्या गोष्टींच्यामुळे सुध्दा ते संतापतात. अथवा हुकूमत गाजविता येईल अशी व्यक्ति शोधून काढतात. हा अहंकार दिसू लागतो तेव्हा तुम्ही हसू लागता आणि माझ्या जवळ काय बिघडले आहे त्याचा विचार करता अहंकार हा संस्कारांच्या प्रमाणे बाहेरून येत नाही तर तो आतूनच येतो. तो कशामुळेही येतो. माणसाला अनेक प्रकारच्या निरर्थक गोष्टींचाही अहंकार होतो. एक दिवस मला एक महिला भेटली. ती इतकी गर्विष्ठ होती की, ती हसतसुध्दा नव्हती मी विचारले "या स्त्रिची काय अडचण आहे? लोक म्हणाले "ती बाहुल्या बनविते म्हणुन तिला गर्व आहे". त्यात विशेष काय आहे? कोणीही बाहुल्या बनवू शकते. व्यक्ति अधीक अधीक मूर्ख होत जाते. अहंकारी व्यक्तिची पहिली खूण ही असते तो 'मी' ने इतका वेढला जातो मी हे केले, मी ते केले". जे बोलू नये ते बोलण्याची लाज पण त्याला वाटत नाही. तो पापमय जीवन जगत असेल. अशा लोकांना स्वैराचाराची, दारू पिण्याची पण आवड असते. मग ते त्याच्या बढाया मारु लागतात. अहंकारी माणसाला लाज नावाचा प्रकार नसतो. तो त्याच्या निरर्थक गोष्टींबद्दल सांगू लागतो. ते लोक त्यांचा कृत्यांचे समर्थन करु लागतात. मी एका माणसाला विचारले, "तुला इतका मोठा हार्ट ॲटॅक आला होता तरी तु दारू का पितोस? दारु पिणे बंद कर." त्याने समर्थन केले की "एक मोठा कारखानदार वयाच्या ९५ या वर्षी सुध्दा दारू पितो व दारू पितो व म्हणून तो यशस्वी आहे." "दारू पिण्यामुळे तो एवढा यशस्वी झाला आहे?" पण साधा विचार नाही कितिही मोठा दारूबाज असू द्या पण त्याचा कोणी पुतळा ऊभा केला आहे का? कोणत्याही देशात दहा बायका

ठेवणाऱ्याची व दारू पिऊन मेला म्हणून त्या माणसाची स्तुती केली जात नाही.

आधुनिक काळात अहंकार बराच पसरला आहे ते,"मला हे आवडत नाही, ते आवडत नाही असे बोलू लागतात अहंकार मूर्ख असल्याने ही संपूर्ण विनाशाची खूण आहे. लोक जसे कपडे घालतात त्यावरून ते मूर्ख आहेत असे दिसते."मला आवडते, त्यात काय बिघडले?" साक्षात्कारी लोकांना ते कसे का असेना पण समजते की, हा माझा अहंकार बोलत आहे. मग ते स्वतःलाच हसतात व स्वतःची थट्टा करतात.

शिवाय, सहज योगात मी लोकांना विचारते "तुम्ही जाऊन कार्य का करीत नाही" ते म्हणतात "श्री माताजी माझा अहंकार वाढेल," "तुमचा अहंकार तुम्हाला दिसत असेल तर तो कसा वाढेल?" काही जळत असेल तर तुम्हाला ते दिसते मग तुम्हाला स्वतःला कसे भाजेल? पण सहज योगात काम टाळण्याचा हा एक सूक्ष्म प्रकार झाला आहे की मी अहंकारी होईन.

विवाहांच्या बाबतीत हे कॉमन आहे. मला सांगतात "श्री मातीजी माझे या मुलीशी लग्न झाले आहे पण आता मला वाटते की मी लग्न करायला नको होते." त्यावेळी तुम्हाला काय झाले होते? मला हे सर्व सांगावे लागते की तुमच्या मूर्ख अहंकारामुळे मला अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागते आपल्यात हा अहंकार कसे कार्य करतो व आपल्याला कसे खाली ओढतो हे पहायला हवे. आपण उन्नतिच्या विषयी उच्च जीवनाच्या विषयी बोलतो त्या वेळी आपण संन्यासी व्हायला हवे, कमळाच्या प्रमाणे पाण्याच्या बाहेर यायला हवे. त्याच्यावर पाणी राहू शकत नाही. कमळाच्या पानावर सुध्दा पाणी थांबत नाही. आपण तसे व्हायला हवे. संन्याशाचे कपडे घालण्याची आवश्यकता नाही पण आतुनच एक प्रकारचे अनासक्त चित्र असते व ते लगेचच तुमच्यात काय प्रश्न आहे ते शोधून काढतो आणि त्यावर कशी मात करायची हे सहज योगात तुम्हाला समजते. ते साध्य करण्यासाठी तुम्हाला आंतरयामी शिव म्हणजे अनासक्त व्हायला हवे. श्रीशिव पूर्ण पणे अनासक्त असतात. ती अनासक्तता तुम्हाला शिवांच्या प्रमाणे सूज्ञता देईल. श्रीसदाशिव आदिशक्तींचे कार्य शांत पणे पहात असतात. त्यांना अहंकार होत नाही की "पहा माझी इच्छा शक्ती काय करते आहे." ते फक्त पहात असतात. पण विनाशाच्या वेळी हा भाग कार्याचा नाश करणार आहे असे दिसताच लगेच ते त्या भागाचा विनाश करतात. आपणही तसेच व्हायला पाहिजे.

आपले जीवन हे मोठे क्षेत्र आहे. त्यात आपण स्वतःविषयी काय समजतो हे पहायला हवे. मी पहाते लोक बोलतात"मी सहज योगी आहे म्हणून काय झाले?" तुम्ही सहज योगी आहात तर असे बोलू शकत नाही तर हात जोडून तुम्ही सांगायला पाहिजे, मी सहज योगी आहे. तुमच्या वागण्यात, तुमच्या बोलण्यात, तुमच्या प्रत्येक बाबतीत, तुम्ही अतिशय नम्र व्यक्ति व्हायला पाहीजे. तसे नसेल तर याचा अर्थ सहज योगाने तुम्हाला दुहेरी अहंकार दिला आहे. श्रीशिव आबोधितपणा, क्षमाशिलता, अणि साधे पणा याच्याबद्दल प्रसिध्द आहेत. ते राक्षसांना क्षमा करतात, प्रत्येकाला क्षमा करतात. तो त्यांचा गुण आहे. पण आदिमातेच्या विरोधात कोणी गेल्यास त्याला सोडत नाहीत हा गुण आपण समजून घ्यायला हवा.

शरणागति याचा अर्थ बाहेरील गोष्टींचा त्याग करणे नव्हे. शरणागति याचा अर्थ पूर्ण पणे स्वतःला स्वच्छ करणे पूर्ण निरासक्त होणे. तुम्हाला उत्क्रान्त होण्याचा निरासक्ती हाच एक मार्ग असू शकतो. काही लोक आजारी पडतात

आणि त्याचे एवढे महत्व करतात ! तुम्ही सहज योगी आहात तर तुम्ही आजारी आहात हे फक्त पहाता. हे खेळकर व आनंदी चित्र असते. मी आले त्यावेळी मला ताप होता पण मला ताप होता याच्यावर कोणाचा विश्वास नव्हता. लग्नांच्या वेळी मी इतकी थकले होते , पण लोक म्हणाले तुम्ही थकलेल्या दिसत नाही." त्याचप्रकारे जीवन ही खेळले पाहिजे. तो केवळ खेळ आहे आणि तो खेळ सुज्ञने मधून पाहिला पाहिजे. विशेष गंभीर काही नाही. सहज योग्यांना काहीच गंभीर नसते. आपल्याला अनेक गोष्टी शिकायच्या आहेत. आपण श्रीशिवांची पुजा करतो तेव्हा त्यांची स्तुति करतो श्रीदेवीची , श्रीशिवांची , श्रीविष्णूंची सहस्त्रनामे आहेत. त्यांचे पठण करून आपण त्यांची पूजा करतो. पण लोकांचे काय ? किती नावे तुम्ही घ्याल ? वास्तविक , पूजेमधे त्यांची नावे घेता त्यावेळी ते सुध्दा जागृत होतात पूजेनंतर , तुम्हाला तसे जाणवते. पण तुम्ही त्याचा उपयोग करीत नाही. मी पाहिले आहे की अनेक लोक पूजेला येतात आणि त्यांच्यात ती शक्ति असते. पण ते बाहेर जाई पर्यंत ती गेलेली असते.

शरणागतिची अधीक एक बाजू असते. मी सहज योगी आहे हे लक्षात घेऊन मी या सर्व शक्ति आंतरयामी ओढून घेतो. एका बाजूस शरणागति आहे. का शरण जायचे ? ओढून घेण्यास. शरण गेले की आपोआप तुम्ही ओढून घेतो. एकदा ओढून घतले की या शक्ति सांभाळून ठेऊन धारण करायच्या आणि लक्षात ठेवायचे की तुमच्या जवळ या शक्ति आहेत.

सहज योगी यांतच अधीक अयशस्वी होतात. सुरवातीस असे झाले की कोणीच सहज योगी कोणासच हात लावेना , कोणाचीच कुंडलिनि चढवेना. मला वाटले आता करायचे ? मी हे प्रवाहक तयार केले आहेत आणि कोणीच हात उचलत नाही. मग मी कसे कार्य करणार ? एकदा नाशिक भागात कार्यक्रम होता. मी नाशिकमध्ये होते आणि कार्यक्रम तीस मैलावर होता. आम्ही अर्धा रस्ता गेलो आणि कार बिघडली सर्व सहज योगी कार्यक्रमास आले होते आणि प्रचंड संख्येने उपस्थित असलेले लोक अशांत होत होते. तेव्हा ते म्हणाले आपण जागृती देऊ. मग त्यांनी जागृती दिली तेव्हा सहज योग्याच्या लक्षात आले की ते जागृती देऊ शकतात. त्याच्या नंतर त्यांनी सुरवात केली. हे गृहीत धरा की माझ्या जवळ शक्ति असून मी त्या व्यर्थ घालविणार नाही तर त्याचा वापर करीन. एकदा मी जहाजाने जात असताना एक माणूस शीत खोलीत अडकल्याने त्यास न्यूमानिया झाला. कॅप्टन माझ्याकडे येऊन म्हणाला त्या माणसास न्युमानिया झाल्याने हेलिकॉप्टरने डॉक्टर आणावयास पाहिजे. मी म्हणाले कॅप्टन मी तुम्हाला आत्मसाक्षात्कार दिला असल्याने तुम्हीच डॉक्टर आहात जाऊन त्या माणसाच्या हृदयावर हात ठेवा. कॅप्टनने तसे केले आणि मग तो माणूस ठीक झाला. त्याला स्वत:चेच आश्चर्य वाटले पण तुम्ही शक्ति धारण न करता केवळ ध्यानच करीत बसाल तर काय उपयोग ?

शिव स्थिती प्राप्त झाल्यावर तुम्हाला आदिशक्तिचे कार्य करायला हवे. तुम्हाला ," आपण सहज योग वाढवायला हवा , कार्य करायला हवे." अशी इच्छा असायला हवी काही वेळेस तुम्ही संस्कारीत व्हाल , किंवा अहंकारी व्हाल. तेव्हा काळजी घ्या. स्वत:कडे लक्ष ठेऊन तुम्ही बरेच काही प्राप्त करू शकाल. काहीनी हे कार्य आपल्या शिरावर घेऊन बरेच केले आहे. प्रत्येक देशात असे लोक आहेत.

शरणागतिची पहिली गोष्ट की प्रथम तुमच्या आत्म्याची शिवाची आणि सदाशिवाची स्थिती प्राप्त करा. दुसरी स्थिती अशी की दुसऱ्यांचा विचार करा प्रथम व्यक्ति , स्वत:चा लाभ आणि नंतर समष्टि म्हणजे सामूहिक अर्थात सामूहिक स्तरावर कार्य करणे. ज्यांना आत्मसाक्षात्कार मिळाला नाही ते लोक सुध्दा इतके संघटन करतात. आता तर तुम्हाला प्रकाश मिळाला आहे तेव्हा तो प्रकाश इतरांच्या पर्यंत घेऊन जाणे महत्वाचे आहे.

• • •

# शिवरात्री पूजा
# प. पू. माताजींच्या हिंदी भाषणाचे भाषांतर

श्रीशिवांच्या बद्दल तुम्हाला बरेच ज्ञान आहे. पण शिवांचे तत्व काय आहे ते तुम्हाला माहित हवे. ते क्षमा करतात. मान, सन्मान सुख, दु:ख कशाचाही त्यांना स्पर्श होत नाही. ते सर्वांच्या पासून दूर आहेत. श्री आदिशंकराचार्यांनी म्हटल्या प्रमाणे चिदानंद रुपः शिवोहं शिवोहं. आदिशंकराचार्यांच्या वेळी त्यांनी शिवोहं सांगीतले, याचा अर्थ मी शिव आहे, ती स्थिती मिळवायची प्रथम वैयक्तिक प्रयत्न त्या नंतर पुढच्या स्थितीत आदिशक्तिंच्या प्रमाणे कार्यशील व्हायचे या दोन स्थिती एक झाल्या नाहीत तर शिवांचे स्थान मिळवून काय फायदा? जर शिवच प्रत्येक गोष्ट करु शकले असते तर त्यानी हे सर्व निर्मितीचे कार्य कशाला केले असते. त्या शव स्थितीपर्यंत तुम्ही जायला हवे, जिथे तुम्ही पूर्णपणे निरिच्छ होता. मग कोणत्याही गोष्टीचा तुम्हाला त्रास होत नाही. लोकांनी मला सांगीतले की एक सहज योगी पैसे खातो दुसरा कोणी अहंकार दाखवितो तिसरे कोणी स्वतःचे महत्व दाखविते. सहज योगात आल्या नंतर सुध्दा लोक असा वेडेपणा दाखवितात सहज योगात आल्यावर प्रथम शिव स्थितीला प्राप्त व्हायला हवे, म्हणजे संपूर्ण निरीच्छपणा, त्याच्यासाठी शरणागति महत्वाची.

पूर्ण शरण गेल्यावर तुम्ही शिव आणि शक्ति यांच्यात येऊ शकता. शिवांना कशाचाच स्पर्श होत नाही त्यांना अहंकारही नसतो व संस्कारही नसतात. त्यांच्या लग्नासाठी ते बैलावर आरुढ होउन आले होते. पार्वतिलासुध्दा लाज वाटली की माझा नवरा मुलगा असा काय आला आहे! पण ते स्वतःच्या समजूतीत रहातात. त्यांच्या वऱ्हाडात अनेक विचित्र दिसणारे लोक होते. कारण कोण कसा आहे. कोणचे कपडे कोणी घातलेत, कोणासारखे कोण दिसतो .. याची त्यांना जाणीव होत नाही. त्यांच्या या गोष्टी लक्षातच येत

नाहीत. ते निरिच्छ होऊन बसले आहेत. ते अबोधित आहेत कारण निरुपयोगी गोष्टी त्यांच्या डोक्यात जात नाहीत.

अनेक लोक कुणाच्या तरी घरी जाऊन विनदिक्कतपणे त्यांच्या गालीचाला वगैरे नावे ठेवतात. पण तुम्ही गालीचाला भेटायला आलात का माणसाला ? कोणी स्त्री , दुसरीच्या साडी वर टीका करते. तुम्हाला माणसाला भेटायचे असते त्याच्या तत्वाला भेटा. माणूस काय आहे ते समजून घ्या. बाह्यातून पहाणे ही शिवांची पध्दत नाही. लोक काय म्हणतील , मी कसे रहावे , हे व्हायला पाहिजे वगैरशी त्यांचा संबंध नसतो. त्यांची पहिली पत्नि वारली तेव्हा तिचे मृत शरीर ते पाठीवर घेऊन गेले. कोण तसे करील ? पध्दति असाधारण आहेत. पण त्यांचे तत्व त्यांच्या मते काय बरोबर व काय चूक आहे , ते समजले पाहिजे. त्यांनी त्यांची पत्नि रावणाला देऊन टाकली होती कारण त्यांना माहित होते की त्यांची पत्नि देवी आहे रावण तिला काय करु शकत होता ? त्याच्या ऐवजी तिच रावणाला ठीक करेल.

प्रत्येक गोष्टीकडे भैतिक दृष्टिकोनातून पहाण्याची आपली प्रवृत्ति असते. बाह्यातील दृष्टि कमी होईल तसे आतली दृष्टि उघडेल. व्यक्तिचे आंतरीक मोल समजण्याचा प्रयत्न करायला हवा. आता खेड्यातील काही लोक थोडेसे अशिष्ट पध्दतिने बोलतात. लोकांच्या विविध भाषा असतात. आणि म्हणून तुम्ही त्यांच्यावर रागवता. पण तुम्ही लक्षात घ्यायला हवे ती त्यांची पध्दत आहे. त्याच्यामूळे आपमान वाटून घेण्याची गरज नाही भैतिक जगातील सुंदर दिसणारी कोणतीही गोष्ट तुम्हाला फसविणारी असते. म्हणून बाह्य जगात एवढे चित्त घालणे चुकिचे असते.

जगात , विशेषतः आपल्या देशात पाश्चात्य संस्कृति कशी येत आहे ते आपल्याला दिसते लोकांची दृष्टि किती बाह्यात आहे ते पण आपल्याला दिसते. इंग्लंडला जिथे थ्री पीसचा सूट घालतात तिथे गांधीजी धोतर नेसून गेले. चित्त आकर्षून घेण्यास लोक असे कपडे परिधान करतात की काय ते पहायला हवे. पण माणूस जेव्हा आतून मुक्त होतो तेव्हा सत्याशिवाय इतर सर्व गोष्टींचे त्याला महत्व वाटत नाही. सत्याला ओळखणे हे शिवांचे पहिले तत्व आहे. तेव्हाच फक्त आपण आदिशक्तिचे कार्य करु शकतो. कोणी काही म्हणाले किंवा अपशब्द उच्चारले तरी काय झाले ? पण आतले तत्व स्पष्ट असावे. दुसऱ्यांच्या मधे तत्व विघडले असले तरी काय झाले ? तुम्ही ठीक करू शकता. तुम्ही दुसऱ्यांच्यावर टीका कराल पण स्वतःवर करणार नाही , तर मग तुम्ही केव्हाच ठीक होणार नाही. शरणागत होणे म्हणजे तुमच्या आंत जे काही आहे ते सोडून रहायचे. शेवटी शुध्द आणि पवित्र असा जो तुमचा आहे , त्याच्या जवळ तुम्ही आनंदात रहाल .आणि तो तुम्हाला पूर्ण कार्यक्षम बनवेल. आज श्रीशिवाची पूजा आहे आणि तुम्ही शरणागतिच्या भावनेने येथे बसले आहात. शरणागतिचा दुसरा भाग जो तुमच्यात आहे , तो म्हणजे तुम्ही आत्मसाक्षात्कारी आहात. तुम्ही लाखांत एक आहात. हा आशिर्वाद तुम्हाला मिळाला आहे आणि आपण किती करू शकतो त्याचा तुम्ही विचार करा.

# मद्रास जाहिर प्रोग्राम १८ जानेवारी ९४

प. पू. माताजी निर्मलादेवींचे भाषण (सारांश)

सर्वात प्रथम म्हणजे आपल्याला सत्य समजलं पाहिजे. सत्य हे काय आहे याचा आपण विचार करू शकत नाहीं, त्याची कल्पना करू शकत नाहीं ते बुद्धीने समजु शकत नाहीं, त्याचं वर्णनही क्ररुं शकत नाहीं. त्याचा अनूभवच घ्यावा लागतो. याच कारणामूळें सामान्य माणूस सत्य जाणूं शकत नाहीं. आज मी जे काय तुम्हाला सांगणार आहे त्याचा नुसते डोळे मिटून स्वीकार करूं नका अशा अंध-विश्वासाचा आपल्याला कांहींच उपयोग होत नाही.एकाद्या शास्त्रज्ञासारखं खुले मन करा आणि सुरवातीला ते गृहीत समजून नंतर त्याचा, हे सत्य आहे याचा पडताळा आला तर मात्र त्याचा प्रामाणिकपणें स्वीकार करा.

सत्य म्हणजे काय ? तुमचा देह म्हणजे तुम्ही नव्हे यालाच सत्य म्हणतात.तसंच तुमच मन, तूमची भावना हे पण तुमचं खरं स्वरुप नाहीं.तुम्ही शूद्ध आत्मा आहात. दुसरं सत्य म्हणजे परमेश्वराची सर्वव्यापी प्रेमशक्ती जिला सत्य म्हणतात, सर्व जीवित कार्य करत आहे. आपण सुंदर फुलं व झाड पाहातो पण आपल्याला त्याचं विशेष असं काही जाणवत नाहीं. पण हा एक चमत्कार आहे. तुमचं ह्रदय बघा. त्याचं कार्य कस चालत ? डॅक्टर लोक म्हणतील की ते स्वयंचलित ( autonomous)मज्जासंस्थेतून चालतं.पण हा (outo) कोण ? लहानपणापासुन आपल्याला पुष्कळ गोष्टी कळत असतात. हे कोण करतं ? माणसाची अगदी गर्भावस्थेपासून वाढ होते, वृक्षांची वाढ होऊन त्यांना फुलं-फळ येतात ; ही वाढ कोण घडवतो ? याचं आपल्याजवळ उत्तर नाही. शास्त्राकडुनही हे प्रश्न सुटत नाहीत. खरं तर शास्त्रंच्या पद्धतीमध्ये नीतिमूल्याना कांही स्थानच नाही पण ही नीतिमूल्याच मानवी जीवनातील महत्त्वाचं अंग आहेत. तुम्ही आधी हे समजून घ्या की तुम्हाला सत्य पाहिजे असेल तर तुम्ही आधी आत्मा व्हायला हवं, स्व-स्वरुपांत यायला हवं. यालाच कांही लोक ब्रम्हशक्ती म्हणतात. कांशी रुह म्हणतात, पातंजली त्याला ऋतंभरा प्रज्ञा म्हणतात.

जोपर्यंत तुम्ही या सर्वव्यापी शक्तीबरोबर जोडले जात नाही तोपर्यंत तुमच्या जीवनाला अर्थ नाही अस्तित्वपण नाही, आणि मग तुम्ही हवेत तरंगत आपल्या मनोव्यापारात गुंतून जाता ज्याला सत्य म्हणून कांही आधार नाही. याच कारणामूळे आपल्यासमोर प्रश्नच प्रश्न आहेत आणि निखळ

सत्यापासून आपण दूर जातो. जे कांही आपल्याला थोडं - फार कळत ते सापेक्ष असतं ; आणि त्यांतूनच आपले प्रश्न , चर्चा , वादविवाद आणि लढाया निर्माण होतात. पण एकदां आपल्याला सत्य अनुभवातून समजलं की मग आपण या नसत्या गोष्टींमधे गुंतणार नाही , त्याच्यात आपला अमूल्य वेळ घालवणार नाही. तुमच्यातील या आत्म्याचा शोध घेण्याकरता या महायोगाच्या देशामधे फार संशोधन व अभ्यास केला गेला.

आजचा सहजयोग ही त्याचीच पुढची पायरी आहे. मार्कंडेयाबद्दल , जो २३०० वर्षांपुर्वी हेऊन गेला , वाचलं तर त्यानें सोळा वर्षाचा असतानाच कुंडलिनीबद्दल लिहून ठेवलेलं आढळेल. मच्छिंद्रनाथ , गोरखनाथ , आदि शंकराचार्य यांनी पण तिच्याबद्दल लिहून ठेवलं आहे.

मद्रासमधें खूप सारं पाठान्तर केलेली बरीच विद्वान मंडळी आहेत असं मी ऐकलं शंकराचार्यांनी म्हटल्याप्रमाणें हे शाब्दिक जंजाळ आहे. ते पूज्य मातेला सांगतात की मला या शद्ब-जालम् पासून दूर ठेवा कबीर म्हणाले " पन्ही पन्ही पण्डित मूरख भये " पण्डित लोक वाचन करून मूर्ख कसे बनतात मला समजत नाही. पण आतां मला तसे खूप भेटले आहेत. त्यांना कितीही सांगा. पण हे प्रत्यक्ष अनुभवायचं असतं , त्याच्याशी एकरूप व्हायचं असत , तेच होऊन जायच - जसा बीजापासून वृक्ष होतो. अंड्यापासून पिल्लू होत. म्हणजे हा तुमचा दुसरा जन्म घटित होणार असतो. हेच आपल्याला मिळवायच आहे. वाचून वाचून नसत्या प्रायश्चित्ताच्या गोष्टी करून काही मिळणार नाही प्रत्येक देशांमध्ये त्या लोकांचे प्रश्न आहेत. उदा. पाश्चात्य लोकांना "म्लेंच्छ" म्हणत. शालिवाहन राजाला ख्रिस्त कश्मीरमधे भेटले आणि म्हणाले "माझं नाव येशू (Isa) आहे आणि मी म्लेंच्छ लोकांचा देश साडून तुमच्या देशांत आले कारण ही योग-भूमि आहे" म्लेंच्छ म्हणजे मल इच्छा - वाईट इच्छा , मनच पूर्णपणे वाईट गोष्टींकडेच वळतं. आपण किती धार्मिक आहोत व शुद्धतेची पवित्रतेची आपण किती काळजी करतो तुम्हाला माहीत नाही. याच्या उलट त्या लोकांची संस्कृतीच मूळी अशूद्धतेकडे झूकलेली आहे. हे सर्व आत्मघातकी आहे. लोकांना आता अशा सवयी लागत आहेत की त्यामधे त्यांचा , त्याच्या कुटूंबाचा , समाजाचा व देशाचा नाश होणार आहे. पाश्चिमात्य लोक यंत्र - उद्योगांत पूढे गेले पण त्यांच्याजवळ सूज्ञता नाही. स्वतःची खरी उन्नति करण्याबद्दल बेफिकीरी आहे. त्यांना जे फसतात व त्यांच्याशी संबंध जोडून पैसा कमावतात अशाच लोकांशी त्याच जमत. असे सर्व लोभी लोक तिकडे गेले आणि जे इथे राहिले तेही उघेडे पडले आहेत.

आपण हे लक्षात घ्यायला हवं की आपल्या देशांत ज्ञान खूप आहे. कुंडलिनी जागृत झालेले व करणारे पण मोठमोठे लोक होते. हा काय मी शोध नाही लावला. हे ज्ञान खूप महात्मे व संत लोकांनी शोधून काढलं. पाश्चात्य संस्कृतीची बाह्यातून खूप वाढ झाली , मोठ्या वृक्षासारखी , पण वृक्षाच्या मूळांची पण काळजी घ्यायला हवी नाही तर वृक्षच कोलमडेल. नीतिमुल्यांची चाड असल्याशिवाय आपल्या जीवनाला काय अर्थ आहे ? या भरतवर्षात जन्म घ्यायलाच मूळी खूप जन्मांच पूण्य आसायला हवं हे लक्षांत घ्या. व्यवहारी आणि शहाणपणाने विचार केला तर प्रपंच टाकण्याची व नसत्या कर्मकाण्डांत गुंतण्याची मुळीच आवश्यकता नाही. अगदी सोपं आहे. आजच्या सहज्योगांतील फरक एवढाच की हजारो लोकांना जागृति मिळणं आता शक्य झाल आहे आतां ही सर्व सामूदायिक उन्नति होत आहे. याचं श्रेय माझ नाही कारण हा काळच तसा आला आहे. हा बहरण्याचा काळ आहे. त्यालाच "शेवटचा निर्णय" (Lsat julgement) असंही म्हणतात. कुराणांत म्हटल्याप्रमाणे हा पुनरूध्दाराचा काळ आहे , त्याला ते "कियामा" म्हणतात. महंमदसाहेबांनी स्वच्छ सांगून ठेतलं आहे की या "कियामा" समयी तुमचे हात बोलू लागतील. पण अंतर्गत भांडण-तंट्यामुळें सर्व धर्म त्याचा मूळ मार्ग सोडून भलतीकडेच वळले आहेत. एक सत्तेच्या नाहीं तर पैशाच्या मागे लागल्यामुळे त्या धर्मात नैराश्य आलं आहे. आपल्या मणक्याच्या शेवटच्या

त्रिकोणांकृति हाडामधें (acrum) ही शक्ति आपल्यांत आहे.म्हणजे ग्रीक लोकांनाही पवित्र शक्ती माहीत होती म्हणून त्या हाडाला ते नाव दिलं गेल. म्हणजेच अथेना (athena) संस्कृतमधे (ath) म्हणजे आदि-शक्ती. अथेना ही आदि-माता होती. तिच शास्त्रामधे मणिपुर द्वीप असा उल्लेख आहे. पुराणातले हे सर्व ज्ञान बुध्दिवाद्यांनी झिडकारून दिलं. हे सर्व जर पूराणिक कथाच असतील तर श्रीराम , श्रीकृष्ण , येशू ख्रिस्त यासुद्धा पुराणकथाच म्हणाव्या लागतील. ज्या विषयाबद्दल आपल्याला कांहीही माहीत नाही, त्याबद्दल मनाला येईल ते बोलण्याचा कुठल्याही बुद्धिवान माणसाला अधिकार ? या अशा बुद्धीने ते स्वतःची फसगत करून घेतातच पण दूसऱ्या माणसामध्येपण भ्रम निर्माण करतात , एवढच नाही तर ज्याची पडताळा घेत नाही तोपर्यंत त्याच्या विरोधात का म्हणून बोलणार? त्याचं वर्णन तरी कस करणार? कुणाबद्दलही काहीही बोलण हे शास्त्राला धरून नाही. प्रथम ते काय आहे ते बघा.

कुंडलिनी ही तुमची आई आहे. ती आदिशक्ती , आदिमायेची प्रतिमा आहे. तुमच्यातील त्रिकोणाकृति हाडामधे तिचा वास आहे. तुम्हाला साक्षात्कार मिळावा याची तिच काळजी घेते-म्हणजेच तुमचा दूसरा जन्म तिला तुमची सगळी माहिती आहे. तुम्ही कशाच्या मागे आहात. काय चूका करता हे पण ती जाणते तरीही ती तुमची आई आहे , फार प्रेमळ आई. अत्यंत हळूवारपणे तिच्याकडून तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळतो. एकाद्या बीजामधून अंकूर फुटावा तसं , जसं बीला जमिनीत पेरल्यावर अंकुर येतो तसं. ती तुमच्यातच आहे ही सर्व यंत्रणा तुमच्यामधेच आहे. सगळ तुमचचं आहे तुमच्यामधे सप्त असलेली शक्ती ती हीच शक्ती कार्यान्वित होते आणि तुम्हाला आत्म-साक्षात्कार देते. याच्यावर आपण विश्वास ठेवणार की नाही ? लोक श्रीचक्रावर विश्वास ठेवतात. श्री-चक्र म्हणजे काय ? ही चक्र म्हणजे काय ? त्याच कार्य कसं चालतं ? तुम्ही आतां शास्त्रीय पद्धतीने ही चक्रेंसिद्ध करू शकता_

कुडलिनीच जेव्हा जाग्रण होतं तेव्हा ती या चक्रांचं पोषण करते या पोषणामूळे ती तुम्हाला शारीरीक मानसिक , भावनिक व अध्यात्मिक फायदे मिळवून देते. सहजयोगामूळे कॅन्सर पण बरा होतो हे आता सिद्ध झाले आहे. नुसते शारीरीकच नाही तर मानसिक रोगही बरे झाले आहेत. आपण इथे आजार बरे करायला मात्र आलो. नाही आम्ही तुम्हाला तुमचे स्वतःचे डॉक्टर बनवणार आहोत स्वतःचे गुरू बनवणार आहोत. तुम्ही स्वतःलाच जाणायचं आणि सुधारायचं तूम्ही एकदा हे मिळवल की मग तुम्ही पण दुसऱ्यांना बरे करू शकाल. याच्याकरतां तुम्हाला प्रथम निर्विचार समाधीच्या स्थितीमधें आलं पाहिजे , ज्यात विचार नसुनही तुम्ही जागे असता. विचार येतात व जातात. पण जाणाऱ्या आणि येणाऱ्या विचारामध्ये जो लहानसा काळ असतो त्याला वर्तमान म्हणतात. तो इतका क्षणभरासारखा असतो की एरवी तो आपल्या लक्षात येत नाही.म्हणजे तूम्ही वर्तमानात राहू शकत नाही– भविष्यकाळ नाही तर भूतकाळांत तुम्ही राहता मी वर्तमानात रहा म्हटलं तर तुम्हाला ते जमणार नाही. मी तुम्हाला लक्ष द्या म्हटल तर ते जमणार नाही कुंडलिनीच जागरण झाल्यावर हा मधला काळ लांबवने एरवी आपण विचारांच्या लाटांवरच नाचत आसतो पण या जागरणानंतर आपल्याला वर्तमान स्थिति प्राप्त होते आणि वर्तमानात विचार नसतो. तेच सत्य आहे. त्या स्थितीमधूनच तूमची आध्यात्मिक वाढ होते. मंत्रपठण वगैरे केल्याने नाही. तुम्ही आत शांत झाला पाहिजे. त्याचवेळी तुम्ही समाधानी असता ही अवस्था मिळाल्यानंतर तुम्हीच शांतीचे स्तोत्र बनता. ही शांतता आपल्याला आतच मिळवायची आहे , तिचा आंतुन अनुभव घ्यायचा आहे. लोक शांततेची चर्चा करतात , त्याकरतां संस्था बनवतात आणि शांतता-पारितोषकही मिळवतात. त्यापैकी बहुतेक जण अहंकारी आणि शीघ्रकोपी असतात. ज्यांच्या ह्रदयांत शांतता नाही ते शांततेचा प्रसार कसा करू शकतील ?

हे घटित होतं. हा नुसतं भाषण करण्याचा किंवा उपदेश

करण्याचा प्रकार नाही. हे असं घटित होतं की तुमची कुंडलिनी अशा स्थानावर येते की तुमच्या दोन विचारांतला विलंब वाढतो व तुम्हाला ते जाणवतं.आजकाल लोकांना जी टेन्शनची बीमारी आहे ती नाहीशी होते. पहिल अनुभव हा येतो की तुमच्या टाळुमधुन थंड हवा बाहेर येत असल्याचं तुम्हाला जाणवतं. हीच थंड हवा तुम्हाला हाताच्या बोटांवरही जाणवते. ख्रिश्चन लोक याला (Holy Ghost) ची थंड झुळुक म्हणतात.हातावर हे जे तुम्हाला जाणवतं त्याला परमचैतन्य म्हणतात. आपल्या बोटांची टोकं म्हणजे सिपथंटिक नर्व्हस सिस्टिमची टोकाचे भाग आहेत म्हणून आपल्याला तिथे संवेदना जाणवते. वेदांमधें याला "विद्" म्हणतात. तुमच्या मध्यवर्ति संवेदना - संस्थेमधेच हे झालं पाहिजे. आपल्या उन्नतीच्या परिक्रियेमध्ये जे कांही आपण मिळवलं आहे ते याच मध्यवर्ति मज्जासंस्थेतुन प्राप्त झालं. हा काही ऐकीव माहितीवर विश्वास ठेवायचा प्रकार नाहीं. तुम्ही कुत्र्याला किंवा घोड्याला एकाद्या घाणेरड्या गल्लीतून नेलं तरी तो चालेल पण माणसाला ते चालणार नाहीं कारण त्याला बोध-स्थिति मिळाल्यामुळे घाणेरडी गोष्ट त्याला समजते- मनुष्यप्राण्यांनी इतर प्राण्यापेक्षा खूप गोष्टी मिळवल्या आहेत. उन्नतीच्या या मार्गात आता थोडा आणखी प्रवास त्याला करायचा आहे आपल्या उत्क्रांतीचा हा शेवटचा टप्पा आहे. हा टप्पा एकदा गाठला की सर्व अध्यात्मिक उन्नति होणार मग तुम्ही दूसऱ्या अवस्थेत–निर्विकार समाधी-मधे येता. तुम्ही तसे होता. सहजच हे नूसत भाषण देणं नाही हे घटित होतं कारण ते तुमच्यांतच असतं तेच प्रवाहित होतं. जसं या भू-मातेमध्ये बी पेरले की त्याला अंकूर फुटतो. कारण परिपक्व होऊन अंकुर फुटण्याची क्रिया त्या बीजामध्ये असते, तशीच या धरणीमातेमध्ये पण असते. हा मायक्रोफोनचे बघा जोपर्यंत तो विजेच्या प्रवाहाशी जोडला जात नाही तोपर्यंत त्याला अर्थ नाही. पण नुसता जोडल्यावर काम देतो. त्याचप्रमाणे आपणही कार्यक्षम आहोत. तुम्ही टी. व्ही. एकाद्या वीज नसलेल्या खेडेगावांत घेऊन गेलात आणि त्या लोकांना सांगितलं की या टी.व्ही.वर चित्र दिसेल तर त्यांचा विश्वास बसणार नाही.तसचं आपण स्वतःला या बॉक्सप्रमाणे समजतो पण आपण तसे नसतो.फक्त तुमचं संधान जोडलं गेलं पाहिजे.एकदा हे संधान लागलं की तुमच्यातील क्षमता आणि शक्ति पाहून तुम्ही आश्चर्यचकित व्हाल.मग तुम्ही दुसऱ्यांची कुंडलिनी जागृत करू शकाल, दुसऱ्यांचे आजार बरे करू शकाल आणि तुम्हाला समाधान मिळेल. तुम्हाला धकवा जाणवणार नाही. शक्तीचा स्त्रोतच प्रवाहित झाल्यामुळे तुम्ही शक्तिशाली बनाल.त्याचबरोबर तुमच्यामधे करूणा निर्माण होते. तुम्ही एक वेगळीच व्यक्ति बनून जाता. तुम्ही संत होता, यक्ष होता जे आजपर्यंत तुम्ही सुप्त अवस्थेत होता. हे सर्व घटित झाल्यावर तुम्ही आत्मा बनता याचं तुम्हालाच नवल वाटतं कारण त्याचे तुम्ही स्वतःच साक्षी होता. तुमचं चित्तच या सर्वाचं साक्षी होत.समजा तुम्ही पाण्यांत पडलात आणि मोठ-मोठ्या लाटा आल्या तर तुमचं मन सैरभैर होईल, पण याच वेळी तुम्हाला बोट सापडली तर तिच्यात बसून तुम्ही लाटांकडे बघत बसू शकाल. त्याहून तुम्हाला जर पोहतां येत असेल तर त्याच पाण्यांत उडी मारून दुसऱ्या बुडणाऱ्या माणसाचा जीव वाचवू शकाल.

त्याचबरोबर तुमचं जीवन सहजसुंदर बनते. सगळ्यांत मोठी गोष्ट म्हणजे तुमचं चित्र शुध्द होते. लोभ व हावरेपणा संपतो.तुमची दृष्टि शांत बनते.पाश्चात्य बायकांना किती पुरुष आपल्याकडे बघत आहेत याचीच उत्सुकता. पुरुषांचाही तसंच. हीच त्यांची आयुष्याची कमाई. ते आणखी बऱ्याच नको त्या वाईट गोष्टी करतात.त्यांना समजत नाही की अशाने आपण पाशवी वृत्तीच्या आहारीं जाऊन शेवटी नरकात जाणार. आपण फार काळजी घ्यायला हवी; कधी कधी याच्या मागे काय आहे हे आपल्याला कळत नाही. तसं आपल्या लोकांची जीवनपध्दति चांगली आहे पण आपण कर्मकाण्डांच्या मागे लागू नये.आपण एक तर मूर्ख बुध्दिवादी असतो नाही तर कर्मकाण्डांत गुंतलेलो असतो.आता उपास वगैरे करण्याची काय गरज आहे? तुम्ही प्रकृतीकरता (आरोग्यासाठी) उपास हवे तर करा पण देवाच्या नावाने

कशाला - जो तुमचा पिता आहे.वडिलांच्या नावाने तुम्ही उपास करतां का ? ईश्वर हा सर्व वडिलांचे वडील आहे. आईला तुमचं असं वागणं आवडणार नाही. तिला नाराज करायचं असेल तर खुशाल म्हणा " माताजी मी अन्न घेत नाही." देवाच्या नांवाखाली उपासतापास करणं , संसार सोडून जाणं आणि नको त्या आचरणाने तुमची अध्यात्मिक उन्नति होत नसते. कोणी म्हणाले बुध्दांनी तेच केलं पण त्यांनी अखंड घेतला.शिवाय त्यांना त्याच्या कार्यासाठी लोक हवे होते म्हणून त्यांनी त्या लोकांना सैन्यास घ्यायला सांगितलं. तो काळ "तपा" चा होता. आत' त्याची जरूर नाही. फक्त तुम्ही आत्मसाक्षात्कारी व्हा. बस.

सगळ्यांत महत्त्वाची व महान गोष्ट म्हणजे तुम्ही आनंदाच्या डोहात उडी घेता. आनंद हा अभेद असतो. आनंदी म्हणजे सुखी असणे वा दु:खी नसणे नव्हे ; हे सर्व तुमच्या अहंकारातून तुम्हाला होतं कारण हा अहंकारच सुखी किंवा दु:खी होतो.ही आनंदाची स्थिती वर्णन करून सांगता येत नाही. त्याची अनुभूतिच घ्यायला हवी.हा परिपूर्ण असतो.कुंडलिनी ही शक्ति म्हणजे शुध्द इच्छा शक्ति. बाकीच्या सर्व इच्छा अशुध्द असतात म्हणून साधारणपणे त्या संपत नाहीत. अर्थशास्त्र हेच सांगते. तुम्हाला आधी एक कोट हवा असतो. मग सायकल , मग मोटार , मग घर — सर्व मिळूनही तुम्हाला समाधान होत नाही. श्रीमंत लोकही माझ्याकडे आले की म्हणातात " माताजी आम्हाला शांती द्या." त्यांच्याजवळ आनंद नसतो आणि शांतिपण नसते.आणि सर्व सांपत्तिक सुख जवळ असून सुध्दा कारण या गोष्टी विकत घेता येत नाहीत. तुम्ही मलासुध्दा विकत घेऊ शकत नाही.या सुंदर फुलांकरता आपण या धरणीमातेला किती पैसे दिले ? तुम्ही देवासाठी पैसे कसे मोजणार ? अ- गुरुंच्या नादी लगून , पैसे खर्च करून पुष्कळ लोकांनी सर्वनाश भोगला आहे. आजही खरे सद्गुरु आहेत पण आजकालच्या युगांत गुरूंचा बाजार चाललेला असतो. जो परमचैतन्याशी एकरूप झाला आहे त्याला पैसा , बँक हे व्यवहार समजतंच नाहीत. देवालासुध्दा बँक हा प्रकार माहीत नसतो. हा पैसाही तुमची डोकेदुखी आहे , पण लक्ष्मी तत्वाचे आशीर्वाद असतातच.

सध्याच्या नवीन युगांत सहजयोग ही एक वेगळीच सृष्टि आहे. आपण थोडंस नम्र व्हायला शिकलं पाहिजे.आपण लक्षांत घ्यायला हवं की आजपर्यंत जे आपल्याला मिळू शकलं नाही ते आज मिळणार आहे.तुम्हाला फक्त त्याच्यासाठी शुध्द इच्छा हवी. परमेश्वराच्या साम्राज्यांत तुम्हाला प्रवेश मिळणार आहे. हे कांही तुम्हाला रत्न देण्यासारखे मूर्खपणाचे चमत्कार नाहीत. चमत्कार एवढाच आहे की तुम्हाला इतक्या वेळा मदत मिळाली , तुमचं रक्षण झालं , तुम्हाला योग्य मार्गावर आणून ठेवलं , तुम्हाला योग्य वेळी योग्य व्यक्ति मिळाली , जीवनामधे तुम्हाला आवश्यक ते सर्व मिळण्यासाठी आशीर्वाद लाभले.

साधक म्हणून तुम्हाला पैसे मोजावे लागत नाही. हे विनासायास होतं.ते तुमच्यातच आहे.तुम्हाला स्वातंत्र्य मिळालं तसंच हे पण मिळणार. पण भारतीय लोकांना सहजयोगांत उत्तरायला वेळ लागतो. परदेशांत हे फार लवकर होतं. ज्या भूमिमध्ये एवढं धार्मिक वातावरण आहे.जिथे शंकराचार्यांसारखे महान पुरूष होऊन गेले त्या देशामधे अध्यात्मिक पातळीवर लोकामधे गहनता कशी नाही येत ?

तुम्ही आत्मसाक्षात्काराकडे गंभीरपणे बघायला हवं तुम्ही म्हणाल मी रोज घरी करतो. पण त्याचा उपयोग होणार नाही कारण ही एक जिवंत क्रिया आहे. उदा. माझं नख कापून इथे ठेवलं तर त्याची वाढ होणार नाही. सहजयोग सगळ्यांकरिता आहे. काही विचित्र लोक तुम्हाला इथे आढळतील पण हरकत नाही.तुम्ही त्यांच्याकडे बघू नका तुम्ही फक्त स्वत:कडे लक्ष ठेवा आणि तुमचा मार्ग तुम्हीच शोधा त्याकरता तुम्हाला पूर्ण स्वातंत्र्य आहे. एका अर्थाने तुम्ही स्वतंत्र असलात तरी त्यामुळे सहजयोगाला मर्यादा पडतात. तुम्हाला हवं असेल तर या , नको असेल तर तुमच्यावर कुणीही बळजबरी करणार नाही. तुमच्या स्वातंत्र्याचा आम्ही आदर करतो.

परमेश्वराचे तुम्हा सर्वांना आनंत आशीर्वाद

# मद्रास १७ जानेवारी १९९४
# (प. पु. माताजींचे सहयोग्यांसमोर भाषण)

आजकाल आपण शब्द-जंजाळामधें हरवलो आहोत. आपण मंत्र-पठण करतो. ग्रंथ-पारायण करतो , आपल्यामधें शैवपंथी आणि वैष्णवपंथी आहेत. या सर्व गोष्टींना आपण महत्त्व देतो कारण हे सर्व केल्यानें आपल्याला मोक्ष मिळणार - अंतिम साध्य अशी आपली समजूत झालेली असते. या बाबतीत भारतीय लोक तत्पर असतात. ते मूलतः धार्मिक प्रवृत्तीचे असतात. योग्य काय अयोग्य काय हे पण ते जाणतात , धर्म आणि अधर्म यातील फरक पण ते जाणतात. ते कांही चूका करतील किंवा धार्मिक शिकवणूकीच्या विरोधात असलेल्या गोष्टींकडे वळतील ; पण त्याचबरोबर आपण ही चूक करत आहोत ही बोच त्यांच्या ह्रदयांत आत दडलेली असते पण त्या बाबतीत काय करावं हे त्यांना कळत नाही.

आपण समजून घेतलं पाहिजे की , आपल्याला आपल्या पूर्वजांकडून जे थोर महात्मे , संत आणि अवतारी पुरूष होते , विशेष कृपाशीर्वाद मिळाले आहेत , त्यांनी आपल्या अध्यात्मिक उन्नतीकरता खूप वेळ आणि श्रम खर्च केले आहेत. त्यांना ऐहिक जीवनाबद्दल आस्था नव्हती. आपल्याकडे विशेषतः दक्षिण भारतातले लोक बरेच धार्मिक प्रवृत्तीचे असतात. मी वाचलेलं आठवतं की शालिवाहनाला काश्मीरमधे ख्रिस्त भेटले होते. ख्रिस्तांनी सांगितलं " मी म्लेच्छांच्या देशांतून आलो ; (मल-इच्छा म्हणजे वाईट , घाणेरडी इच्छा) त्यांना वाईटाचीच इच्छा असते–चांगल्या गोष्टीची मुळीच नाही. तुमच्याकडचे लोक निर्मल शुध्द आहेत म्हणून मी इकडे आलो. " शालिवाहन म्हणाले " तुम्ही इकडे येऊन काय करणार ? तुम्ही म्लेंच्छ लोकांबरोबरच राहून त्यांच्यासाठी कांहीतरी करा." आपण आजही जरा वेगळ्या प्रकारचे लोक आहोत. सध्याच्या या भयंकर कलियुगांतही सत्तर टक्के लोक देवावर विश्वास ठेवणारे आहेत. त्यांना देवाबद्दल श्रध्दा आहे आणि भीति पण.

आपल्या लोकांची ही प्रवृत्ती खरं म्हणजे ज्याला आपण जाणूं शकत नाही त्याच्याबद्दलची , अतर्क्य वस्तूबद्दल असावी तशी भीती आहे. ईश्वर म्हणजे प्रेमाचा व करूणेचा सागर आहे हे आपण ओळखत नाही. आपण मानवप्राण्यांना त्याच्यासाठी एका विशिष्ट अवस्था मिळवावी लागते. आपण देवाला ओळखत नाहीच पण स्वतःलाही ओळखत नाही. आपण प्रथम आपल्यातील 'स्व' लाच ओळखायला पाहिजे. आपल्या स्वरूपाची ओळख पटल्यावरच आपण ईश्वराला ओळखू शकू. मी या दक्षिण प्रदेशांत कर्मकाण्ड खूप चाललेलं पाहते. हे सर्व अगदी मनापासून करणारे लोक पाहून मला आश्चर्य वाटलं ; पण आपण हे कां करतो हे खरं म्हणजे त्यांना कळत नाही. हे सर्वकांही श्रध्देने चालतं पण ती डोळस श्रध्दा नसल्यामुळे त्यांतुन पदरांत कांही पडत नाही. या लोकांनी याच्या पलीकडे जायला हवं हे त्यांना कसं पटवायचं हा मी विचार करू लागले.



पुढील मजकूर मागिल कव्हर पानावर –

मागिल कव्हर पानावरून पुढे -

तुमच्याजवळ श्रध्दा हवीच पण ती श्रध्दा प्रकाशित असायला हवी. जोपर्यंत तुम्ही स्वतः प्रकाशित होत नाही तोपर्यंत या भक्तीला अर्थ नाही. हा मायक्रोफोनच बघा ना ; जोपर्यंत विजेच्या प्रवाहाशी तो जोडला जात नाही तोपर्यंत त्याचा काय उपयोग होणार ? तसंच जोपर्यंत भक्तीमधून तुम्ही यासर्व व्याप्त - ईश्वरी प्रेमशक्तीशी ब्रह्मचैतन्य जोडले जात नाही तोपर्यंत भक्तीला अर्थ राहणार नाही. कारण ते एखाद्या तार तोडून टाकलेल्या टेलिफोनसारखं असतं. हा योग व्हायलाच हवा ही अगदी साधी गोष्ट आहे. तुम्ही पुष्कळ ग्रंथ वाचा , वेदांचा अभ्यास करा , कांही उपयोग नाही. जसं तुम्ही डोकं दुखतं म्हणून डॉक्टरकडे गेलात , त्याने औषधाचं नांव लिहून दिलं , तुम्ही वाचलं पण औषध घेतलं नाही. हे जोपर्यंत तुम्ही समजून घेत नाही तोपर्यंत तुमच्यासाठीच वाढून ठेवलेलं तुम्हाला मिळणार नाही. कारण केवळ अज्ञानामुळेच या सर्व समजुती आपल्यामधे रूजून गेल्या आहेत. केवढं अज्ञान ! एवढं अज्ञान म्हणजे बाहेर पडायला वाव नसणारा खड्डाच. खूप पुस्तकं वाचलेले लोक मी पाहिले आहेत ; लाख लाख मंत्र म्हणणारे , उपास-तापास करणारे लोकही असतात. पण त्यांना कांहीच मिळालं नाही. ते जास्तच शीघ्र-कोपी असतात किंवा त्यांच्या अंतःकरणांत आनंद नसतो. ते घरदार , प्रपंच सोडून जातात , त्यांना वाटतं आपण खूप त्याग केला आहे. परमेश्वराला हा मूर्खपणा पसंत नाही जर परमेश्वर तुमचा पिता आहे , जो करूणा व प्रेमाचा सागर आहे त्याला तुम्ही दुःखी असलेलं कसं चालेल ?

तुम्ही कष्ट कां करून घ्यायचे ? कष्ट केल्यानेंच मोक्ष कसा मिळतो हे मला तर समजतच नाही. दुसऱ्या दृष्टीने बघितलं तर जसं कबीर म्हणाले होते की " जर उपास करून मोक्ष मिळणार असेल तर आपल्या देशांत उपाशीपोटी असलेले खुप लोक आहेत त्यांना पण मोक्ष मिळायला हवा. जर मुंडन करून मोक्ष मिळणार असेल तर बिचाऱ्या शेळ्या , ज्यांचं दर वर्षी मुंडन होतं त्या तुमच्या आधीच तिथे पोचतील ". सर्व संतांनी या कर्मकाण्डावर उपहास केला आहे. त्या सर्वांनी वेगवेगळ्या तऱ्हांनी तुम्हाला सांगितलं की या बाह्यातल्या कर्मकाण्डांचा कांही उपयोग नाही. तुम्ही ते सर्व प्रामाणिकपणे करतां हे खरं , कारण त्यांतून तुम्हाला मोक्ष मिळवायचा असतो , साक्षात्कार हवा असतो. आई म्हणून मी तुम्हाला सांगते की हे सर्व करायची जरूर नाही. हे सर्व बंद करा. आता तुम्हाला आईला त्रास द्यायचा असेल तर प्रथम तुम्ही म्हणाल की मी जेवणार नाही. तर मग तर तुम्ही हे सर्व का करता ? त्याची कांही जरूरी नाही. अन्नाला आपण फार महत्त्व दिलं आहे. पहाटे चार वाजतांच उठून मंत्र म्हणायला सुरूवात होते व सर्व घर गजबजायला लागतं.

आणखी एक प्रकार म्हणजे खोट्या गुरुंच्यामुळे तुमच्यावर होणारे परिणाम , प्रभाव , मद्रासमधे तर हे फारच आहे ; प्रत्येकजण कुठल्या ना कुठल्या गुरुचा गुलाम असतो. कलकत्ता तर त्यापेक्षा भयंकर. प्रत्येकाला कुठल्या तरी गुरूची वा तांत्रिकाची दीक्षा मिळालेली असते. अशा खोट्या गुरूंच्या प्रभावामुळे तऱ्हतऱ्हेच्या बाधा होतात आणि त्यांची उन्नति होत नाही. त्यांचं लक्ष्मीतत्त्वच बिघडतं. म्हणून ही गरीबी कधीच संपणार नाही , जोपर्यंत या खोट्या व अघोरी गुरुंचा प्रभाव संपत नाही. भारतात सगळीकडे असे गुरु सापडतील. इथले लोक मात्र साधे आहे व महात्म्यांचा आदर करणारे आहेत.

जसा मुसलमान लोक जेहाद करतात तसं आपण आपल्यावरोबर जेहाद करायला निघालो आहोत. आपण आपलाच नाश करत आहोत. उपास करा , हे करू नका , ते करा - सारख रोजचं आपल्या पाठीमागे आहेच. परमेश्वराने हे जग तुमच्या सुखाकरतां , आनंदाकरतां निर्माण केलं आहे. जर तुम्हाला एवढा त्रास करून घ्यायचा असेल तर त्याला हे सुंदर जग निर्माण करायची काय जरूर होती ?

सहजयोगांत तुम्हाला तुमची खरी ओळख झालेली आहे. या परमचैतन्याबरोबर योग झाल्यावर तुम्ही किती उच्च स्थितीवर आहात. तुमच्यात काय काय शक्ती जागृत झाल्या आहेत हे तुम्ही जाणता. तुम्ही आतून किती सुंदर होता आणि आपल्या स्वरूपाचा आदर करू लागता. तुमच्यामधे अहंकार रहात नाही पण स्वतःबद्दल योग्य ती समज निर्माण होते. इथे सहजयोगी झालेले इतके लोक बघून आणि अजून पुष्कळ जण सहजयोग करायला उत्सुक असल्याचं पाहून मला फार समाधान झालं आहे. सहजयोगामधून पुष्कळ लोकांचे आजार बरे झाले आहेत. पण त्याहीपेक्षा तुम्हाला मानसिक शांति मिळाली आहे. मानसिक दृष्ट्या तुम्ही पूर्णपणे संतुलनात येता आणि सर्वात मोठं म्हणजे तुम्ही दुसऱ्याला आत्मसाक्षात्कार देऊ शकता. प्रथम तुम्हाला

निर्विचार समाधी मिळते व नंतर निर्विकल्प समाधी प्राप्त होते.परमचैतन्याबरोबर तुमचं संधान झाल्यावरच ही अवस्था तुम्हाला मिळते. ही एक प्रशंसनीय गोष्ट आहे. बंगलोरमधील एक शास्त्रज्ञ टिश्यू-कल्चर करतात. त्यांनी मला सांगितलं की " आधी मला ५० टक्के यश मिळायचं.मी सहजयोगी आहे ; नुसतं उभं राहू मी त्यांना चैतन्यलहरी देतो. आता मला १०० टक्के यश मिळतं " तसाच एक साधा शेतकरी , ज्याला इंग्रजी भाषा मुळीच येत नाही , म्हणाला " माताजी , मला आता इतकं ज्ञान मिळालं आहे की मला आंतून ते जाणवतं." म्हणून तुम्ही कोण नाहीत ते तुम्ही प्रथम ओळखलं पाहिजे ; म्हणजे तुम्ही आता नुसते साधे मानव नाहीत ही महत्त्वाची गोष्ट लक्षात घ्या. तुम्ही या प्रोग्रामला आलात म्हणजे तुम्ही साधक आहात , विशेष माणसं आहात.मग तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला , सर्व शक्त्या मिळाल्या.तुम्ही त्याकरतां पी.एच्.डी.पंडित किंवा आणखी कोणी मोठा अधिकारी असायला हवं असं नाही. ज्यांना आपण कोणी विशेष व्यक्ती आहोत असं वाटतं त्यांना हा अनुभव मिळणार नाही ; कारण त्यांना साधारण व्यवहार ज्ञान हरवलेलं असतं.उदा.मंत्री , राजकारणी इ.लोकांना हे अवघड जातं.मग त्यांना हे कसं प्राप्त होणार ? जेव्हां त्यांना आंतून ही शुध्द इच्छा होईल तेव्हा , तसं प्रामाणिकपणे वाटेल तेव्हा हे सर्व इतकं महान आहे की त्यामध्ये अशक्य असं काही नाहीच अगदी लहान मुलं पण तुम्ही कुठे चुकत आहांत , तमचं कुठलं चक्र खराब आहे हे तुम्हाला सांगतील.हा मोठा शोध आपल्याला सहज मिळण्यासारखा आहे म्हणून आपण ते लक्षांत घेत नाही. कदाचित् आपल्यांतच ही ईश्वरी देणगी आहे [illegible] आपल्याला कल्पनाच नसावी.

मी रशियांत गेले होते तेव्हा लेनिनग्राडमधील सेन्ट पीटर्सबर्ग या सगळ्यांत जुन्या विद्यापीठाने माझा सन्मान केला आणि त्या विद्यापीठाच्या दहा लोकांच्या मंडळात मला सभासद केलं.तेव्हा ते पाहून मी म्हणाले " मी एक साधी गृहिणी आहे , कोणी शास्त्रज्ञ नाही." आईन्स्टाईनला हा मान मिळाला होता.ते म्हणाले " आईन्सटाइनने काय केलं ? तर त्याने फक्त सृष्टीच्या जड कार्यांकडे लक्ष दिलं. त्याने अणूवर जड द्रव्यावर अभ्यास केला.तुम्ही जिवंत मानवावंर कार्य करत आहांत."

हे सगळं घटित होणार आहे.तुम्ही आजपर्यंत ज्या अंधारात चालत होतात त्यांतून बाहेर पडून प्रकाशांत यायचं आहे. तुम्हीच तुमच्याकडे बघा आणि स्वतःला ओळखा.सर्वप्रथम तुम्ही या देशांत जन्माला आलांत त्याअर्थी तुम्ही कांही तरी पुण्यच केलेलं असणार.ही केवढी मोठी कृपा तुमच्यावर झाली आहे याची तुम्हाला कल्पना नाही. तुम्ही जिथे आता बसला ती भूमि इतकी पवित्र भूमिमाता आहे की जगांत दुसरीकडे इतकी पुण्यवान भूमि नाही. पण तुम्हाला आत्मसाक्षात्कार झाल्याशिवाय या गोष्टीची किंमत व महति समजणार नाही.म्हणून मी तुम्हाला नीट समजावून सांगत आहे की जरी तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला तरी लक्षांत घ्या की तुम्हाला जीवनांतील अनमोल असं कांही प्राप्त झालं आहे जे एरवी तुम्हाला मिळणं शक्य नव्हतं. पण ते सत्य आहे ; स्वतःबद्दल किंवा दुसऱ्याबद्दल , स्वतःच्या किंवा दुसऱ्यांच्या चक्रांबद्दल सर्व कांही तुम्हाला हाताच्या बोटांवर समजेल.

हे तुम्हाला एक फार मोठं बक्षिस मिळालं आहे आणि तेच दुसऱ्या लोकांना , ज्यांना अजून ते प्राप्त नाही , देणे हाच त्याचा खरा उपयोग आहे. ही गोष्ट केलीत तर तुमच्या हातून फार मोठं कार्य घडल्यासारखं होईल व साऱ्या विश्वाच्या या मोठ्या सागरामध्ये मिसळून जाल कारण तीच या सहजयोगाची जिवंत संघटना आहे. मग जगभर तुम्हाला मित्र भेटतील , सर्व जगांतले लोक तुम्हाला ओळखतील. तुम्ही सहजयोगांत आल्यानंतरही तुमचे रिवाज , नातलग वगैरे सर्वांचा आदर ठेवला जाईल.हे नका करू , ते नका करू असं कोणी म्हणणार नाही. तुम्हीच तुमचे स्वतःचे गुरू व्हाल कारण आता तुमच्या चित्तात प्रकाश आला आहे.

परमेश्वराचे तुम्हाला अनंत आशीर्वाद.

प्रश्न : माणसाच्या आयुष्याचा खरा अर्थ कोणता ?

उत्तर : परमेश्वरी कार्याचं साधन बनणे आणि त्याच्या आशीर्वादाने पावन होणे.



सहयोगी सभासदांसाठी विनामुल्य

P. B. KALE.